**भारत-सिंगापूर राजनैतिक संबंधांची 60 वर्षे**

16 जानेवारी, 2025

वर्ष 2025 मध्ये भारत आणि सिंगापूर मधील राजनैतिक संबंध प्रस्थापनेची 60 वी वर्षपूर्ती साजरी केली जात आहे. विशेष प्रसंगाचे औचित्य साधून, आदरणीय राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू आणि सिंगापुरचे महामहिम राष्ट्राध्यक्ष थर्मन षण्मुगरत्नम यांच्या हस्ते संयुक्त बोधचिन्हाचे 16 जानेवारी 2025 रोजी नवी दिल्ली येथे अनावरण करण्यात आले.

2. संयुक्त बोधचिन्हात समाविष्ट घटक: भारत आणि सिंगापुरच्या राष्ट्रध्वजातील रंग, कमळ (भारताचे राष्ट्रीय फूल) व ऑर्किड (सिंगापुरचे राष्ट्रीय फूल) आणि 60 व्या वर्षपूर्ती प्रसंगाला अधोरेखित करण्यासाठी 60 संख्येचा ठळक उल्लेख. संपूर्ण बोधचिन्हात "भारत सिंगापूर राजनैतिक संबंधांची 60 वर्षे" असे ठळक शब्दांत लिहिलेले आहे. बोधचिन्हात या घटकांचा समावेश करुन दोन्ही देशांतील मैत्रीपूर्ण संबंध, परस्पर विश्वास आणि सामायिक मूल्ये अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.

3. गेल्या अनेक वर्षांपासून भारत-सिंगापूर संबंध घनिष्ठ आणि विविधांगी बनले आहे. आमचे द्विपक्षीय संबंध राजकीय, संरक्षण, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि नागरिक परस्पर संपर्क दृढ करण्याद्वारे वैशिष्ट्यपूर्ण बनले आहेत. आमचे घनिष्ठ आणि मैत्रीपूर्ण संबंधामुळे प्रगत उत्पादन, कनेक्टिव्हिटी, डिजिटायझेशन, आरोग्य आणि वैद्यक सेवा, शाश्वतता आणि शिक्षण व कौशल्य विकास या क्षेत्रात सहकार्य विस्तार करणे शक्य ठरले आहे.

4. भारताचे 'ॲक्ट ईस्ट' धोरण आणि इंडो-पॅसिफिक व्हिजनसाठी इंडोनेशिया हा महत्वपूर्ण आधारस्तंभ आहे. आमच्या राजनैतिक संबंधांच्या 60 व्या वर्षपूर्ती निमित्ताने भारत आणि सिंगापूर द्विपक्षीय भागीदारीला किती महत्त्व देतात हे दर्शवणारे अनेक स्मरणीय कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

नवी दिल्ली

16 जानेवारी, 2025